**पोलीस अधीक्षक कार्यालय नाशिक ग्रामीण,**
पोलीस मुख्यालय, आडगाव नाशिक - पीन ४२२००३, दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७००
**E.mail - sp.nashik.r@mahapolice.gov.in**

---

**प्रेस नोट** दिनांक :- २४/०७/२०२३

# पळाशी, ता.नांदगाव येथील नागरीकांची AEPS द्वारे ऑनलाईन फसवणूक करणारे आरोपींकडून सुमारे ३ लक्ष रूपयांचा मुद्देमाल हस्तगत

---

नाशिक ग्रामीण सायबर पोलीस स्टेशन गुरनं ०८/२०२३ भादवि कलम ४२० सह आय टी ॲक्ट ६६क, ६६ड प्रमाणे दिनांक १७/०७/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयात अज्ञात इसमांनी पळाशी गावातील नागरीकांचे बॅंक ऑफ महाराष्ट्र शाखा वेहळगाव, ता. नांदगाव येथील खात्यांमधून संमतीशिवाय आर्थिक फसवणूक करण्याचे इराद्याने एकूण २,६६,७९९/- रूपये कुठल्यातरी AEPS (आधार ईनेबल पेमेंट सिस्टीम) सेंटर येथून अंगठयाचे ठशांव्दारे पैसे काढून घेतले म्हणून श्री. समाधान संजय घुगे, रा.पळाशी, ता.नांदगाव यांनी फिर्याद दिली होती.

सदर प्रकरणी सायबर पोलीस ठाणेकडील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिकदृष्टया तपास करून चाळीसगाव तालुक्यातून आरोपी नामे **१) किशोर लक्ष्मण सोनवणे,** वय २१, रा. उपखेडा, ता. चाळीसगांव, जि. जळगांव, **२) रविंद्र विजय गोपाळ**, वय २३, रा. बानगांव, ता. चाळीसगांव, जि. जळगांव, व **३) सोमनाथ काकासाहेब भोंगाळ,** वय २३, रा. बानगांव, ता. चाळीसगांव, जि.जळगांव यांना वरील गुन्हयात अटक केली होती. यातील आरोपींची मा. न्यायालयाने ०३ दिवस पोलीस कोठडी रिमांड मंजूर केली होती, दरम्यान सदर गुन्हयाचे तपासात आरोपींकडे चौकशी केली असता, त्यांचे कब्जातून वरील गुन्हयात वापरलेले ०४ मोबाईल फोन, ०४ लॅपटॉप, ०४ बायोमॅट्रीक फिंगर स्कॅनर, ०१ आयरीस मशिन, ०१ फेस कॅमेरा तसेच फसवणूकीचे पैशातून खरेदी केलेल्या ०२ टी.व्ही.एस. कंपनीच्या रेडर मोटर सायकल असा एकुण २,८३,०००/- रूपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे.

दिनांक २१/०७/२०२३ रोजी यातील आरोपींना पुन्हा मा. न्यायालयात हजर केले असता, आरोपी क्र. १ किशोर सोनवणे यास दि. २४/०७/२०२३ पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती. सध्या सर्व आरोपी न्यायालयीन कोठडीत असून सदर गुन्हयाचा पुढील तपास मा. पोलीस अधीक्षक श्री. शहाजी उमाप यांचे मार्गदर्शनानुसार सायबर पोलीस ठाण्याचे पोनि श्री. सत्यजित आमले यांचे पथक करीत आहेत. तपासाअंती यातील आरोपींकडून अजून काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

यातील आरोपींनी माहे जानेवारी २०२३ मध्ये नांदगाव तालुक्यातील पळाशी व वेहेळगाव येथे आधारकार्ड अपडेशन कॅम्प घेतला होता. सदर कॅम्पमध्ये बायोमॅट्रीक फिंगर स्कॅनरव्दारे उपस्थित नागरीकांचे अंगठयांचे ठशांचा डाटा संकलीत करून, त्याव्दारे CSC Digipay ऑनलाईन मनी ट्रान्सफर सर्व्हीस ॲपमध्ये नागरीकांचे ठशांचा वापर करून संबंधीतांचे बॅंक खात्यांवरून परस्पर पैसे काढून घेतले होते.

**नागरीकांना आवाहन :-**

नाशिक ग्रामीण जिल्हयातील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, शासनमान्य आधारसेवा केंद्रावर जाऊनच आपली आधार संबंधीत माहीती अद्यावत करावी. कोणीही इसम अशाप्रकारे अनाधिकृत आधार अपडेशन कॅम्प घेत असेल तर नजीकचे पोलीस ठाणेशी तात्काळ संपर्क करावा. तसेच आधारकार्ड अद्यावत करण्याचे नावाखाली AEPS (आधार ईनेबल पेमेंट सिस्टीम) सेंटरव्दारे ऑनलाईन फसवणूक झाल्यास त्वरीत संबंधीत बॅंक शाखा, नजीकीचे पोलीस ठाणे अथवा नाशिक ग्रामीण सायबर पोलीस ठाणे (०२५३-२२००४०८) येथे संपर्क साधावा.